K.T.S.P. Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurnagar




# Extension activity

# A.Y. 2021-22

# HIV testing Camp



## एचआयव्हीवर प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध

### समुपदेशक नायकोडी : हुतात्मा राजगुरूनगर महाविद्यालयात जनजागृती

राजगुरूनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, मातेकडून गर्भाला किंवा स्तनपान करणाऱ्या बाळाला संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर यातून एचआयव्ही विषाणूचा प्रसार होऊन एड्सची लागण होते. एचआयव्हीवर अत्यंत प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध असून त्यावर योग्य प्रकारच्या वैद्यकीय काळजी घेण्याची गरज असल्याचे समुपदेशक संतोष नायकोडी यांनी सांगितले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामीण रुग्णालय चांडोली यांच्या वतीने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही जनजागृती अभियान आणि तपासणी शिबिर सोमवारी (दि. ६) पार पडले, त्यावेळी नायकोडी बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, समुपदेशक संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अल्ताफ पठाण, आरोग्य सेविका मुस्कान मोमीन, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. डी. एम. मारकड, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा.कविता वाळुंज, प्रा. सोनल मांडे व रासेयो विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपापल्या आरोग्याबाबत परिपूर्ण माहिती ठेवून एचआयव्ही सारख्या संसर्गजन्य आजारांपासून जागरूकपणे दूर राहण्याचे आवाहन केले. यावेळी करण्यात आलेल्या एचआयव्ही तपासणीत सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी तर प्रा. नीता डोंगरे यांनी आभार मानले.

**HIV testing camp organized by NSS department in collaboration with Central Hospital, Chandoli.**



# Covid vaccination camp

पुढारी

## राजगुरू महाविद्यालयात लसीकरण

राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयात राज्य शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेंतर्गत विशेष कोविड-१९ लसीकरण शिबिराचे मंगळवारी (दि. २६) आयोजन करण्यात आले होते. लसीकरण मोहिमेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पंचायत समितीचे सभापती अरुण चौधरी यांच्या हस्ते झाले.



लसीकरण शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील.

याप्रसंगी माजी सभापती अंकुश राक्षे, संचालक डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, डॉ. चंद्रगुप्त मखरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, मेजर ए. बी. कानवडे उपस्थित होते.

याप्रसंगी अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी, अठरा वर्षे पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी लसीकरण करून शासनाच्या युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या शिबिरात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्यासह डॉ. चंद्रगुप्त मखरे, आरोग्यसेवक आशा जीवने, सतीश मोरे, वर्षाराणी वाळुंज, छाया नेवसे, सोनाली सावंत, अतिश काळबांडे यांच्यासह आशा वर्कर सुवर्णा कानडे, दीपाली कोबल सहभागी झाल्या. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि विद्यार्थी विकास मंडळ विभागांनी लसीकरण शिबिराचे नियोजन केले.

प्रा. गणेश घुमाळ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. आर. थोरात यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नीता डोंगरे यांनी आभार मानले.

**Covid vaccination camp organized by College**

## राजगुरू महाविद्यालयात किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी करोना प्रतिबंधक लसीकरण शिबीर

राजगुरूनगर
जनप्रवास प्रतिनिधी

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात १५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी करोना प्रतिबंधक लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. पूनम चिखलीकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा.एस. एन. टाकळकर, डॉ संजय शिंदे, पर्यवेक्षक प्रा.पी.पी.चव्हाण, प्रा.ए.ई.थिगळे, प्रा.आर.टी. डगले, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात १५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजीत कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबिर प्रसंगी संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील व इतर मान्यवर.

याप्रसंगी बोलताना डॉ. पूनम चिखलीकर म्हणाल्या की १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांनी प्राधान्याने आपले लसीकरण करून घेणे गरजेचे असून आरोग्य केंद्राच्या माध्यमातून कोणीही विद्यार्थी लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी १५ ते १८ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, तसेच करोना प्रतिबंधक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य सहायिका आशा जिवने, संगीता ठाकूर, संध्या अडसुळे, अर्चना गायकवाड, सुवर्णा कानडे, आशा तळेकर यांनी सहभाग घेतला.

सूत्रसंचालन व स्वागत प्रा. व्ही.बी. दौंडकर यांनी केले.

लोकमत



कोरोना लसीकरण कार्यक्रम




कोरोना लसीकरण कार्यक्रम

# Farmers Assembly





## शेतकऱ्यांची गुंतवणूक ताकद वाढवावी

ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे मत; साहेबराव सातकर यांच्या पुतळ्याचे अनावरण


करताना मान्यवर
रक्तदान शिबीर-सहभागी विद्यार्थिनींचे स्वागत


महाविद्यालयीन उपक्रम
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
2022.01.21 11:57

# Health Check-up Camp




